नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०९/२०२६ (सोमवार)

## नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीण येथे मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते श्री गणरायाची आरती

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीण येथे स्थापित करण्यात आलेल्या श्री गणपती बाप्पाची आरती आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी मा.श्री हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली.

या वेळी मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षकांनी श्री गणरायाचे पूजन व आरती केली. तसेच हजर असलेल्या सर्व शाखांच्या अधिकारी व अंमलदार यांच्याशी संवाद साधून आगामी येणाऱ्या विसर्जन बंदोबस्ताबाबत विशेष मार्गदर्शन केले तसेच शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीणचे अधिकारी व अंमलदार यांच्यासह पोलीस अधीक्षक कार्यालय येथील सर्व शाखांचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.





## अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या २ अरोपींताविरूध्द गुन्हा नोंद.
## आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन बोरी :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक २०/०९/२०२६ रोजी दोन आरोपींना अग्निशस्त्रासह ताब्यात घेवुन लोखंडी देशी बनावटीचे माऊझर (अग्निशस्त्र) व दोन काडतुस जप्त केले आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोलीस स्टेशन बोरी येथे चोरीच्या गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील आरोपी हा वैभव उर्फ गोल्डी हा असुन तो त्याचे साथीदारासह बुटीबोरी व एमआयडीसी परिसरात अग्नीशस्त्र घेउन फिरत आहे. अशा माहिती वरुन आरोपी **वैभव उर्फ गोल्डी कमलादास नारनवरे, वय ३२ वर्ष रा. दिक्षीत नगर, ऑटोमोटीव्ह चौक नागपुर** व

त्याचा साथीदार **२) दिपसिंग उर्फ चिंटु दारासिंग बावरी, वय ३२ वर्ष, रा. सातगाव, ता. हिंगणा, जि. नागपूर** यांना ताब्यात घेऊन त्यांचे जवळुन एक लोखंडी देशी बनावटीचे माऊझर (अग्नीशस्त्र) व दोन काडतुस जप्त केले आहे. आरोपी क्र. १) याने पोलीस स्टेशन बोरी परिसरात केबल चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी देशी बनावटीचे माऊझर (अग्नीशस्त्र) किंमती ४०,०००/—रूपये व दोन काडतुस किंमती २०००/—रूपये, गुन्ह्यात वापरलेली एक होन्डा एक्टिव्हा एम एच—३६/ए एच—४९९७ किंमती ६०,०००/—रूपये, दोन मोबाईल ३०,०००/—रूपये असा एकुण किंमती १,३२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपीविरूध्द कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदयान्व्ये गुन्हा नोंद असुन नमुद आरोपींना अटक करण्यात आले आहे.**



## केबल चोरीचा गुन्हा उघड, ०३ आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन बोरी :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात पथकाने केबल चोरीचा गुन्हा उघड करून तिन आरोपींना अटक करून ०१ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोलीस स्टेशन बोरी येथे दाखल अप. क्र. ८०५/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. गुह्याचा समांतर तपास करीत असतांना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक २०/०९/२०२६ रोजी सदर गुन्ह्यातील आरोपी क्र **१) वैभव उर्फ गोल्डी कमलादास नारनवरे, वय ३२ वर्ष, रा. दिक्षीत नगर, ऑटोमोटीव्ह चौक, नागपुर** याला ताब्यात घेवुन त्याच्या कडे सदर गुन्हयाबाबत कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने त्याचे साथीदार आरोपी क्र **२) राहुल महाप्रसाद अंबाडरे, वय २८ वर्ष, रा. आधार नगरी डोंगरगाव, ता. जि नागपुर आणि ३) आकाश उर्फ गोची हरबचनसिंग बावरी, वय १९ वर्ष , रा. रुईखैरी, ता. जि नागपूर** यांच्या सह पोलीस स्टेशन बोरी परिसरात केबल चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद आरोपी क्र २ आणि ३ चा शोध घेवुन त्यांना एमआयडीसी बोरी परीसरातुन ताब्यात घेतले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून १) केबल जाळुन त्यामधील तांब्याची तार ३० किलो किंमती ३०,०००/— रुपये २) गुन्ह्यात वापरलेली हिरो स्प्लेंडर मोसा एम एच—३१/ए एक्स—९८०७ किंमती ५०,०००/—रूपये ३) दोन मोबाईल किमतीं २०,०००/—रूपये असा एकूण १,००,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयातील आरोपींना अटक करण्यात आले आहे.**

# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपुर ग्रामीण जिल्हयात रुट मार्च, मॉक ड्रिल व रेस्क्यू ऑपरेशनचे आयोजन

**आगामी गणेश विसर्जन तसेच आगामी सण—उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत पोलीस यंत्रणेची तयारी तपासण्यासाठी दिनांक २१/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात बोरी, एमआयडीसी बोरी, बेला, पारशिवनी आणि देवलापार या पोलीस स्टेशनच्या अंतर्गत रूट मार्च सह दहशतवादी अथवा आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी अँटी टेरर ड्रिल (Anti-Terror Drill) आणि प्रत्यक्ष रेस्क्यू ऑपरेशन चे (Rescue Operation) प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.यामध्ये मुख्यालयातील अधिकारी आणि क्विक रिस्पॉन्स टीम (QRT) अंमलदार, पोलीस स्टेशन येथील पोलीस अंमलदार/कर्मचारी तसेच होमगार्ड सहभागी झाले होते.**

**पोलीस स्टेशन बोरी :—** पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत ही कारवाई पार पडली. तसेच बोरी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

**पोलीस स्टेशन बेला :—** सहा पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे, प्रभारी अधिकारी यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन बेला अंतर्गत ही कारवाई पार पडली. तसेच बेला शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** सहा पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत ही कारवाई पार पडली. टाकळघाट येथील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

**पोलीस स्टेशन पारशिवणी :—** सहा पोलीस निरीक्षक श्री किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत ही कारवाई पार पडली. पारशिवणी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

**पोलीस स्टेशन देवलापार:—** सहा पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन देवलापर अंतर्गत ही कारवाई पार पडली. तसेच देवलापार

शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.

**वरील पोलीस स्टेशन अंतर्गत  संवेदनशील आणि प्रमुख बाजारपेठांच्या भागातून पोलीस दलाचा शिस्तबद्ध रुट मार्च काढण्यात आला, ज्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. आपत्कालीन किंवा दहशतवादी परिस्थिती उद्‌भवल्यास त्याला तात्काळ व प्रभावीपणे कसे तोंड द्यावे, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी नागरिकांचा बचाव कसा करावा, यासाठी रेस्क्यू ऑपरेशनचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.  नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आणि आपत्कालीन प्रसंगी पोलिसांची प्रतिसाद क्षमता  अधिक मजबूत करणे हा या मॉक ड्रिलचा मुख्य उद्देश होता.**




Dalmia
cement






श्रीकृपा स्टेशनरी
मो.9923283943
ONLINE SERVISES
CYBER CAFE



## मौदा पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन मौदा हदद्दीतील सराईत आरोपी शाम राजु धुर्वे, वय २५ वर्ष, रा. दिघोरी (काळे), ता. कामठी, जि. नागपूर यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे. नमुद सराईत गुन्हेगार याचेवर शरीराविरूद्ध तसेच मालमत्तेविरूद्ध यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे.**

नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपी अशा प्रकारचे गुन्हे करीत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती तसेच आरोपीच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव मौदा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या

मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद गुन्हेगार **शाम राजु धुर्वे, वय २५ वर्ष, रा. दिघोरी (काळे), ता. कामठी, जि. नागपूर यास** तिन महिन्याकरीता नागपुर जिल्हयातुन हद्पार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**




**हद्दपार आरोपी शाम राजु धुर्वे**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४० हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २०/०९/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने एक इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा पंडीत गनपत बमनोटे याच्या घराबाहेरील सार्वजनिक रोडवर, वार्ड क्र. ०१, बेलदारपुरा, ता. सावनेर,

जि. नागपूर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान प्लेजर स्कुटी क्र. एम. एच—४०/टी—६११७ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता गाडीच्या डिक्कीमध्ये एका पांढ—या रंगाच्या प्लास्टीक पॉलिथीन मध्ये देशी दारू दारूच्या निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे पंडीत गनपत बमनोटे, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र .०१, बेलदारपुरा ता. सावनेर जि. नागपूर हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १० निपा किंमती ४००/—रूपये २) प्लेजर स्कुटी क्र. एम. एच—४०/टी—६११७ किंमती ४०,०००/—रूपये, असा एकुण किंमती ४०,४००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी पंडीत गनपत बमनोटे, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र .०१, बेलदारपुरा ता. सावनेर, जि. नागपूर याचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक २०/०९/२०२६ रोजी कन्हान पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे १) **शुभम अमोल मालाधरे, वय २२ वर्ष, २) तुषार मंगल पाटील, वय १९ वर्ष, ३) जितेन्द्र बैसाखु धुर्वे, वय ३० वर्ष, ४) वैभव अमोल मालाधरे, वय २२ वर्ष, सर्व रा. धरमनगर कन्हान ता. पारशिवनी** हे खदान नं. ०३ कडून टेकाडी गावाकडे जाणारा रोड टेकाडी येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी गुन्हा करण्याचा उद्देशाने फिरतांना मिळुन आले. त्यांना त्यांचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपींचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०८ गुन्हे दाखल, ४२ हजार २५० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक २०/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे पंडीत गनपत बमनोटे, वय ७० वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, बेलदारपुरा ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे संजय हालकसिंग कायदा, वय ३३ वर्ष, रा. नोनजापूर, ता. पांढूर्णा, जि. छिंदवाडा, ह. मु. पंधराखेडी, ता. सावनेर यांचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कुही** अंतर्गत आरोपी नामे १) क्रिष्णा शंकर हिरेखन, वय ४६ वर्ष, रा. पारडी, ता. कुही, जि. नागपूर २) योगेंश्वर नामदेव मने, वय ३५ वर्ष, रा. किन्ही, ता. कुही, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत १)** जितेन्द्र विठया उईके, वय ३७ वर्ष, रा. देवलापार, तह. रामटेक २) महिला आरोपी प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत महिला आरोपी हिचेवर** ०१ गुन्हा नोंद**, पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत महिला आरोपी हिचेवर** ०१ गुन्हा नोंद**,**

**नमुद कारवाईत एकुण ९०० मिली देशी दारू, २१ लिटर मोहाफुल दारू, ०१ दुचाकी वाहन असा एकुण ४२,२५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर